## प्रकाशन शाखेमार्फत प्रकाशित करण्यात येणारी प्रकाशने

| अ.क्र. | प्रकाशनाचे नाव | कालावधी | अद्ययावत वर्ष | स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्राची आर्थिक पाहणी | वार्षिक | २०२५-२६ | छापिल प्रकाशन | राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका, खंड १ ला, परि क्र. १३९ नुसार अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी' हे महत्वपूर्ण प्रकाशन दरवर्षी विधानमंडळास अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयातर्फे सादर करण्यात येते. सदर प्रकाशन मराठी व इंग्रजी भाषेमध्ये स्वतंत्र तयार करण्यात येते. या प्रकाशनामध्ये महाराष्ट्र राज्याच्या अर्थव्यवस्थेची काही ठळक वैशिष्ट्ये आणि विविध आर्थिक क्षेत्राबाबत समयसारणी स्वरुपात सांख्यिकीय आकडेवारी देण्यात येते. या प्रकाशनात लोकसंख्या, राज्य उत्पन्न, किंमती व सार्वजनिक वितरण व्यवस्था, लोकवित्त, संस्थाद्वारे वित्त पुरवठा आणि भांडवली बाजार, कृषि व संलग्न कार्ये, उद्योग, सहकार, उर्जा, वाहतूक व दळणवळण, शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, महिला व बालविकास, रोजगार व दारिद्र्य, गृहनिर्माण, पाणीपुरवठा व स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | सामाजिक न्याय, मानव विकास आणि शाश्वत विकास ध्येये या विषयांचा समावेश आहे. दृष्टिक्षेपात महाराष्ट्र मध्ये महत्त्वाच्या बाबींची राज्याकरिता दशवार्षिक आकडेवारी दिलेली असते तर महाराष्ट्र आणि भारताची तुलनात्मक माहिती मध्ये महत्त्वाच्या बाबींकरिता महाराष्ट्र व भारत यांची तुलनात्मक आकडेवारी दिलेली असते. तसेच प्रकाशनात महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे आणि भारतातील सर्व राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक दिले जातात.<br>सन २००६-०७ पासूनचे अहवाल संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यापूर्वीच्या वर्षांचे अहवाल संचालनालयाच्या ग्रंथालयात जतन करुन ठेवण्यात आलेले आहेत. |

| अ.क्र. | प्रकाशनाचे नाव | कालावधी | अद्ययावत वर्ष | स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| २ | महाराष्ट्राची आर्थिक आकडेवारी | वार्षिक | २०२४ | संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध | सदर प्रकाशनात राज्याच्या विकासक्षेत्रांविषयक महत्त्वाच्या अशा प्रशासनिक संरचना, लोकसंख्या, राज्य उत्पन्न, ग्राहक किंमती निर्देशांक, औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक, राज्य शासनाचे जमा व खर्च, कृषि, वीज, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, वने, दुग्धव्यवसाय, सहकार, उद्योग, संयुक्त भांडवली संस्था, कामगार व रोजगार, वैद्यकीय व आरोग्य सेवा, शिक्षण, परिवहन व दळणवळण, स्थानिक स्वराज्य संस्था, पोलिस, बंदरे, बँकींग, छापखाने व प्रकाशने इ. २४ बाबींची अद्ययावत माहिती संक्षिप्त स्वरुपात प्रकाशित करण्यात येते.<br>सदर प्रकाशनाचे २००७ पासूनचे अहवाल संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यापूर्वीच्या वर्षांचे अहवाल संचालनालयाच्या ग्रंथालयात जतन करुन ठेवण्यात आलेले आहेत. |

| अ.क्र. | प्रकाशनाचे नाव | कालावधी | अद्ययावत वर्ष | स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ३ | महाराष्ट्राची संक्षिप्त सांख्यिकी | वार्षिक | २०२३ | संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध | सदर प्रकाशनात हवामान, लोकसंख्या, कृषि, पशुसंवर्धन,मत्स्यव्यवसाय, वने, उद्योग व खाणकाम, वीज, बँकींग, सहकार, वाहतूक व दळणवळण, बंदरे, देशांतर्गत व्यापार, शिक्षण, जीवनविषयक आकडेवारी, पोलिस व गुन्हे, कारागृहे, गृहनिर्माण, स्थानिक स्वराज्य संस्था, निवडणूका, किंमत निर्देशांक, रोजगार, छापखाने व प्रकाशने, वार्षिक योजना, राज्य वित्त, राज्य उत्पन्न, व संकीर्ण (पर्यटन, नियंत्रित बाजारपेठा, विमा व्यवसाय, कच्चे तेल व नैसर्गिक वायु यांचे साठे, उत्पादन व वापर इ.) इ. विषयांबाबत १३१ तक्त्यांमध्ये सांख्यिकीय माहिती समाविष्ट आहे. तसेच राज्याच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीबाबतच्या काही निवडक निर्देशकांचे कल, महाराष्ट्र राज्य व भारत यांची तुलनात्मक माहिती यांचा देखील या प्रकाशनात समावेश आहे.<br>सदर प्रकाशनाचे २००९ पासूनचे अहवाल संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यापूर्वीच्या वर्षांचे अहवाल संचालनालयाच्या ग्रंथालयात जतन करुन ठेवण्यात आलेले आहेत. |

| अ.क्र. | प्रकाशनाचे नाव | कालावधी | अद्ययावत वर्ष | स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ४ | महाराष्ट्राची पायाभूत सुविधा सांख्यिकी | द्वैवार्षिक | २०२१-२२ व २०२२-२३ | छापिल प्रकाशन | या प्रकाशनात राज्यातील सामाजिक पायाभूत सुविधांमधील परिवहन, ऊर्जा,दळणवळण, सिंचन, पिण्याचे पाणी पुरवठा आणि स्वच्छता, साठवण, शिक्षण व आरोग्य या ८ क्षेत्रांची राज्य स्तरावरील पायाभूत सांख्यिकीय माहिती ५७ तक्त्यांत संकलित केलेली आहे.<br>सदर प्रकाशनाचे २००९-१० व २०१०-११ पासूनचे अहवाल संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. |
| ५ | महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे व भारतातील राज्यांचे निवडक निर्देशक | वार्षिक | २०२३-२४ | संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध | या प्रकाशनात महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे १३९ निर्देशक व भारतातील राज्यांचे १३५ निर्देशक प्रकाशित करण्यात येतात.<br>सदर प्रकाशनाचे २००७-०८ पासूनचे अहवाल संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. |

| अ.क्र. | प्रकाशनाचे नाव | कालावधी | अद्ययावत वर्ष | स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ६ | महाराष्ट्र राज्याची विस्तृत सांख्यिकी | वार्षिक | २०२२-२३ | संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध | या प्रकाशनात आर्थिक व सामाजिक बाबींवरील जिल्हानिहाय विस्तृत तक्ते प्रकाशित करण्यात येतात. या प्रकाशनात लोकसंख्या, हवामान, शेती, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, रोजगार, उद्योग, किंमती, व्यापार, सहकार, बँका व योजना, आरोग्य, शिक्षण, स्थानिक संस्था, लोकवित्त, राज्य उत्पन्न इ. विषयांवरील २४७ तक्ते समाविष्ट आहेत.<br>सदर प्रकाशन सन २०२२-२३ पर्यंत 'महाराष्ट्र राज्य सांख्यिकीय गोषवारा' या नावाने प्रकाशित करण्यात येत होते. सन २००७-०८ पासूनचे अहवाल संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यापूर्वीच्या वर्षांचे अहवाल संचालनालयाच्या ग्रंथालयात जतन करुन ठेवण्यात आलेले आहेत. |

| अ.क्र. | प्रकाशनाचे नाव | कालावधी | अद्ययावत वर्ष | स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ७ | महाराष्ट्र राज्य पर्यावरण सांख्यिकी | वार्षिक | २०२४ | संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध | या प्रकाशनामध्ये पर्यावरणीय परिस्थिती आणि गुणवत्ता, पर्यावरण संसाधने आणि त्यांचा उपयोग, पर्यावरणीय अवशेष, आपत्ती व आपत्कालीन घटना, मानवी वसाहती आणि पर्यावरण आरोग्य व पर्यावरण संरक्षण, व्यवस्थापन आणि नियमन अश्या सहा विषयांवरील माहितीचा समावेश आहे.<br>सदर प्रकाशनाची 'महाराष्ट्र राज्य पर्यावरण सांख्यिकी २०२४' ही पहिली आवृत्ती जून, २०२५ मध्ये प्रकाशित करण्यात आली असून सदर प्रकाशन संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |